DF no.36/2020

**<u>अंतिम हुकूमनामा अर्ज क्र.३६/२०२०</u>**
**<u>जुना अ.हु.अर्ज क्र.१/२०१८</u>**
**<u>निशाणी २३ खालील आदेश</u>**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार तर्फे दाखल करणेत आला असून अर्जदार यांनी असे कथन केले की, मुळ अर्जातील जाबदार भानुदास गोपाळ कुलकर्णी हे दिनांक ०७.०५.२०२२ रोजी लेंगरे येथे मयत झाले आहेत. अर्जदार हे वयस्कर असून पुणे येथे राहणेस आहेत. अर्जदार अजारी असलेने त्यांचे उपचार सुरु आहेत. तसेच जाबदार यांचा मृत्युदाखला प्राप्त न झालेने वेळेत जाबदार यांचे वारस अभिलेखावर दाखल करणेकरीता अर्ज दाखल करता आला नाही. मयत जाबदार भानुदास कुलकर्णी यांचे वारस अर्जाचे कामी अभिलेखावर घेणे आवश्यक आहे त्यामुळे अर्ज मंजूर करणेत येवून जाबदार यांचे वारस रकॉर्डवर घेण्यास परवानगी मिळावी अशी वादीने विनंती केली आहे.

२. जाबदार तर्फे अर्जास म्हणणे दाखल न केलयाने प्रस्तुत अर्ज त्यांचे विरुध्द विनाम्हणणे चालविणेत आला.

३. अर्जदार यांचा निशाणी २३ वरील अर्ज व अर्जाच्या पृष्ठ्यर्थ प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. तसेच अर्जदार यांनी जाबदार यांचा मृत्युदाखला दाखल केला आहे. मुळ अर्ज अर्जदार यांनी रे.दि.मु.नं.६२/२०१५ च्या प्राथमिक हुकूमनाम्यावरुन अंतिम हुकूमनामा होवून मिळणेकरीता दाखल केला आहे. दरम्यान जाबदार भानुदास कुलकर्णी हे दिनांक ०७.०५.२०२२ रोजी मयत झाले. अर्जदार यांनी प्रस्तुत अर्ज दिनांक १८.११.२०२२ रोजी दाखल केला आहे. म्हणजेच अर्जदार यांनी प्रस्तुत अर्ज विलंबाने दाखल केला आहे.

**DF no.36/2020**

फलित व परिणामकारक हुकूमनामा होणेकरिता प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरते. तसेच निशाणी २३ वरील अर्जाव्यतिरीक्त जाबदार यांना अन्य कोणतेही वारस नसल्याचे कथन केले. जाबदार यांनी केलेला विलंब द्रव्यदंडावर माफ करुन वारस रेकॉर्डवर घेणे न्यायोचीत वाटते. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

(१) निशाणी २३ कडील अर्ज र.रु.१००/- (र.रु.शंभर मात्र) तालुका विधी सेवा समिती, विटा (खानापूर) येथे जमा करणेचे अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

(२) वादीने अर्जात नमूद केल्याप्रमाणे दुरुस्ती या अर्जाचे आदेशापासून १४ दिवसांचे आत करावी व दुरुस्त अर्जाची प्रत हजर करावी.

(३) सदर दुरुस्तीची नोंद संगणक प्रणालीमध्ये तसेच दाव्याचे नोंद रजिस्टरमध्ये घेणेत यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

सत्यमेव जयते

Digitally signed by SONTAKKE AHILYABAI BALIRAM
Date: 2025.04.08 11:34:14 +0530

विटा.
दिनांकः- ०५.०४.२०२५

**[श्रीमती अ.प्र.मानव (अ.ब.सोनटक्के)]**
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
विटा. जि. सांगली.